# आरोग्य सुविधा आणि ग्रामीण विकास

**डॉ. एस. एन. आकुलवार**
सहा.प्राध्यापक व विभाग प्रमुख
लोकप्रशासन विभाग
बलभीम महाविद्यालय, बीड जि.बीड

सामान्य नागरीकांना उच्च दर्जाची आरोग्य सेवा देणे, आरोग्य योजना विषयक माहिती ग्रामिण जनतेला उपलब्ध करुन देणे महत्त्वपूर्ण आहे. ज्यामुळे गरीब, गरजू ग्रामीण जनतेस सहज, विश्वासार्ह व परवडण्याजोगी आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा प्राप्त होण्यास मदत होइल. ग्रामीण जनतेचे आरोग्य सुधारेल. सक्षक्त निरोगी समाज जीवनासाठी आरोग्य महत्वपूर्ण घटक आहे. भारतातील लोकसंख्येचा विचार केला असता जवळपास 65% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. या ग्रामीण जनतेच्या विकासासाठी अनेक पायाभूत सुविधा सेवा प्रदान करुन त्यांचा सामाजिक आर्थिक विकास घडवून आणण्याला प्राथमिकता दिली जात आहे. या पायाभूत सुविधामध्ये शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज, रस्ते, घर इ. चा समावेश होतो.

❖ **शोध निबंधाचा उद्देश :**

प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

1. आरोग्य संकल्पना व आरोग्य सुविधा (संस्था) चा आढावा घेणे.
2. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन चा अभ्यास करणे.

❖ **संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोध निबंधासाठी विश्लेषनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच माहिती संकलन द्वितीयक स्त्रोत, शासकिय अहवाल, शासन संकेतस्थळे याचा आधार घेतला आहे.

❖ **आरोग्य :** 'Health is wealth' आरोग्य हीच संपत्ती आहे. निरामय आरोग्य, सदृढ कुटूंब संपूर्ण राष्ट्राच्या शरिरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विकासाचे द्योत्तक होय. व्यक्ती / नागरिक शारीरिक व मानसिक दृष्ट्या सदृढ असणे म्हणजेच आरोग्य होय. **'आरोग्य म्हणजे रोगाचा अभाव नसून ती एक मानसिक, शारीरिक, सामाजिक व अध्यात्मिक समतोलाची अवस्था होय.'** मानवी संसाधन विकास व आयुष्याच्या उन्नतीसाठी आरोग्य महत्त्वपूर्ण घटक आहे. या दृष्टीनेच ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामीण जनतेला गुणकारी, आरोग्यवर्धक व शक्य तितक्या जवळ आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न शासन-प्रशासन करते. कारण मानव विकासात शिक्षण, आरोग्य व अन्न या घटकांना महत्व असते. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात आरोग्य सुविधांची उपलब्धता कमी दिसून येते. परिणामपी आरोग्य सुविधांपासून कोणताही नागरीक दूर राहू नये तसेच त्याच्या जीवास धोका निर्माण होऊ नये हा दृष्टीकोन समोर ठेवून केंद्र व राज्य शासन, आंतरराष्ट्रीय संघटना, स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून आरोग्य सुविधा-सेवा ग्रामीण भागातील जनतेला उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले जाताना दिसून येते. कारण आरोग्याचा प्रश्न हा इतर अनेक समसया (प्रश्नांशी) संबंधित असतो म्हणून इतर विषयाप्रमाणे आरोग्याकडे बहुज्ञानशाखीय दृष्टीकोनातून पाहीले पाहीजेत.[1]

ग्रामीण भागात आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, फिरते आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ट्रामा केअर यूनिट इ. स्थापन करण्यात आलेली माध्यमातून मूलभूत आरोग्य सुविधांचा विकास, तज्ञ व प्रशिक्षीत व्यक्ती (डॉक्टर) उपलब्ध करुन दिले आहेत. जसे कुटुंब कल्याण कार्यक्रम, NRHM, आयुष अभियान, महात्मा फुले जन आरोग्य योजना इ.

भारतामध्ये 1977 साली ग्रामीण आरोग्य सेवा योजना 'जनतेचे आरोग्य जनतेच्या हातात' या तत्वाला अनूसरुन कार्यान्वीत केली.[2] या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण आरोग्य मार्गदर्शक आरोग्य सेवा प्रदान करण्यासंदर्भात प्राथमिक प्रशिक्षण देवून नागरीकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झाला आहे.

❖ **राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन :**

भारतामध्ये आरोग्य सेवांच्या असमान उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील आरोग्य स्थिती असमाधानकारक होती. परिणामी ग्रामीण जनतेस गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांची उपलब्धता सुधारणे, आरोग्य सेवेतील त्रुटी दूर करणे, आरोग्य क्षेत्रात विकेंद्रीत नियोजनास प्रोत्साहन देवून ग्रामीण आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी 12 एप्रिल 2005 रोजी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन सुरु करण्यात आली.

ग्रामीण विकासात स्वच्छता, निरोगी जीवनाला महत्त्व दिले जाते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनच्या माध्यमातून गरीब, ग्रामीण नागरीकांना परवडण्याजोगी व विश्वसनीय आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे तसेच आरोग्यावर प्रभाव पाडणाऱ्या आहार, परिसर, स्वच्छ पाणी पुरवठा, महिला व बालविकास, आयुर्वेदिक उपचार इ. घटकांचा एकत्रीत विचार करण्यात आलेला आहे.[3]

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (मिशन) 100% केंद्र पुरस्कृत असून ते राज्यशासनाद्वारे राबविण्यात येते. या माध्यमातून पूर्ण देशात आरोग्य सेवा व पायाभूत संरचना उत्कृष्ठ दर्जाच्या प्रदान करण्याला प्राधान्य दिले. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनचे ध्येय[4] पुढील प्रमाणे आहेत.



140 36